पोलीस निरीक्षक N.C.R.B (एन.सी.आर.बी) अलिबाग पोलीस ठाणे

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

**1. District (जिल्हा):** रायगड **P.S.(ठाणे):** अलीबाग **Year (वर्ष):** 2021

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0085 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 02/06/2021 04:51 बजे

**2.**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

**3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

**1. Day(दिवस):** दरमियानी दिन

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 31/05/2021

**Date To ( दिनांक पर्यंत):** 01/06/2021

**Time From (वेळेपासून):** 00:01 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 18:26 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 02/06/2021 **Time (वेळ):** 03:31 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 005 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 02/06/2021 03:31 बजे

**4. Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

**5. Place of Occurrence (घटनास्थळ):**

**1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पूर्व, 1 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** एमएसईडीसीएल चे सबडिव्ह, कार्यालय चेंढरे अलिबाग येथे ,कार्यालयाचे गेटजवळ, ताअलिबाग

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** निलेश शरद पाटील

**(b) Father's Name (वडील चे नाव) :** शरद पाटील

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1978 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
**ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | 205, ई विंग, , कष्णदर्शन, पिंपळभाट, चेंढरे,अलिबाग,अलीबाग,रायगड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | 205, ई विंग, , कष्णदर्शन, पिंपळभाट, चेंढरे,अलिबाग,अलीबाग,रायगड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री.अतुल मनोहर मोरे | | वडील का नाम : मनोहर मोरे | 1. मुक बधीर शाळेच्या पाठीमागे,बालाजी टवर समोर, पाण्याचे टाक,चेंढरे, अलिबाग,अलीबाग,रायगड,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

वरील तारखेस वेळी ठिकाणी यांतील फिर्यादी यांनी कॉन्ट्रॅक्ट घेतलेल्या श्रीमती हिना शेठ यांचे नागाव येथील हॉटेलला ट्रान्सफॉर्मर बसविण्यासाठी फिर्यादी यांचे कडुन 15000 रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेच्या रक्कमेचा पहीला हप्ता रुपये 5700 रुपये पंच व साक्षीदारां समक्ष स्वीकारताना अॅन्टी करप्शन ब्युरो रायगड पथकाने रंगेहात पकडुन लाचेची रक्कम आरोपीत यांचे कडुन जप्त केली म्हणुन.
अलिबाग पोलीस ठाणे क.गु.र.नं 85/2021 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 चे कलम 7 प्रमाणे
फिर्यादी- निलेश शरद पाटील वय 43 वर्षे, व्यवसाय- एम.एस.ई.डी.सी.एल.कॉन्ट्रॅक्टर, रा. 205, ई विंग,
कृष्णदर्शन, पिंपळभाट, चेंढरे, ता.अलिबाग. जि.रायगड (मोबाईल नंबर 9822504033)
आरोपी- श्री.अतुल मनोहर मोरे वय 32 वर्षे, कनिष्ठ अभियंता, एम.एस.ई.डी.सी.एल. नागाव सेक्शन, वर्ग-3, रा. मुक बधीर शाळेच्या पाठीमागे, बालाजी टॉवर समोर, पाण्याचे टाकीजवळ, चेंढरे, अलिबाग जि.रायगड मुळ रा. प्लॉट नंबर 251, फ्लॅट नंबर 104, श्रीराम कॉम्प्लेक्स, कानसई सेक्शन, अंबरनाथ पुर्व
गु.घ.ता.वेळ ठिकाण- दिनांक 01/06/2021 रोजी 18-26 वाजता मौजे एम.एस.रइ.डी.सी.एल. चे सबडिव्हिजन कार्यालय चेंढरे अलिबाग येथे कार्यालयाचे गेटजवळ, ता.अलिबाग.
लाचेची मागणी- 30,000/- रूपये
स्विकारले- रक्कम 7,500/- रूपये
हकिगत- मी निलेश शरद पाटील वय 43 वर्षे, व्यवसाय- एम.एस.रइ.डी.सी.एल.कॉन्ट्रॅक्टर, रा. 205, ई विंग, कृष्णदर्शन, पिंपळभाट, चेंढरे, ता.अलिबाग. जि.रायगड (मोबाईल नंबर 9822504033) समक्ष अलिबाग पोलीस ठाणे येथे हजर राहून खबर लिहून देतो की,
मी वरील ठिकाणी माझे कुटुंबासह रहातो. मी महावितरण कंपनीचा शासकिय ठेकेदार आहे रायगड जिल्हा तांत्रिक प्रशिक्षित बेरोजगार सेवा सहकारी संस्था, मर्यादीत रायगड अशी संस्था रजिष्टर असून मी सदर संस्थेचा चेअरमन आहे. माझे संस्थेकडून महावितरणाची विद्युत खांब उभे करणे रोहीत्र (ट्रॉन्स्फॉर्मर) बसवून देणे अशी कामे केली जातात.
श्रीमती हिना जितेंद्र शेठ यांचे मौजे नागांव येथे हॉटेलचे बांधकाम सुरू आहे. त्याकरीता त्यांना 47 kw एवढया क्षमतेची विद्युत जोडणी आवश्यकता आहे. भविष्यात विद्युत लोड वाढणार असल्याने 100 KVA {ामतेचा रोहीत्र (ट्रॉन्स्फॉर्मर) मंजुरीची आवश्यकता असल्याने व त्यांना M.S.E.D.C.L कार्यालयात पाठपुरावा करणे शक्य नसल्याने व त्यांचे हॉटेलला मुदतीत विघृत पुरवठयाची आवश्यकता असल्याने ही सर्व कामे करून देण्यासाठी त्यांनी माझे वरील संस्थेशी संपर्क केला-
श्रीमती हिना शेठ या दिनांक 29/04/2021 रोजी आमचे संस्थेत समक्ष येवून हॉटेलच्या विद्युत पुरवठयाबाबत माझेशी चर्चा करून

त्यांचे हॉटेलकरीता विद्युत पुरवठा करण्यासाठी लागणारे विद्युत खांब उभे करणे ,रोहीत्र (ट्रॉन्स्फॉर्मर) बसवून देणे बाबतची सर्व कामे करून देण्याबाबतचा 100 रू. चे बॉन्ड पेपरवर करार लिहून दिला दिनांक 26/05/2021 रोजी श्रीमती हिना शेठ यांचे वतीने मी मा.कार्यकारी अभियंता अलिबाग विभाग, म.रा.वि.वि.कंपनी मर्यादीत यांचेकडs 100 KVA {ामतेचा रोहीत्र (ट्रॉन्स्फॉर्मर) मंजुर करून मिळणेकरीता अर्ज केला आहे.

मी दिनांक 27/05/2021 रोजी कार्यकारी अभियंता अलिबाग कार्यालयात C.F.C. मध्ये नोंदणी केली व सदरचा अर्ज इस्टीमेट करणेकरीता कनिष्ठ अभिंयता नागांव यांचेकडे देणेकरीता माझे ताब्यात घेतला दिनांक 27/05/2021 रोजी श्री.मोरे, कनिष्ठ अभियंता नागांव यांचे मोबाईलवर संपर्क केला असता त्यांनी ते कार्यालयात नसल्याचे सांगितले.

आज दिनांक 31/05/2021 रोजी मी श्री.मोरे, कनिष्ठ अभियंता यांना भेटलो व इस्टीमेट देणे बाबत विनंती केली असता श्री.मोरे हे मला म्हणाले की, ट्रॉन्स्फॉर्मर इस्टीमेट देणे करीता 30,000 रूपये लागतील त्यावेळी मी श्री. मोरे साहेब यांना ठिक आहे असे सांगितले.

या वरून माझी खात्री झाली की, श्री.मोरे कनिष्ठ अभियंता, एम.एस.ई.डी.सी.एल. नागांव सेक्शन हे ट्रॉन्स्फॉर्मर इस्टीमेट देणेकरीता 30,000/- रूपये लाचेची मागणी करीत आहे. त्यांना लाचेची रक्कम दिल्याशिवाय ते ट्रॉन्स्फॉर्मर इस्टीमेट काम करणार नाहीत त्यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांचे विरूध्द कारवाइ होणेकरीता, मी दिनांक 31/05/2021 रोजी पोलीस उप अधीक्षक श्रीमती सुषमा सोनावणे मॅडम, अँन्टी करप्शन ब्युरो, रायगड अलिबाग यांचेकडे तक्रार दिली.

त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्रीमती सुषमा सोनावणे, मॅडम यांनी मला सांगितले की, मी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने दिनांक 01/06/2021 रोजी लोकसेवक मोरे, कनिष्ठ अभियंता एमएईडीसीएल नागाव सेक्शन यांच्या कार्यालयात जावून दोन पंचासमक्ष पडताळणी करण्यात येईल व पडताळणीमध्ये लोकसेवक यांनी लाचेची मागणी केल्यास त्यानंतर त्यांचेविरूध्द लाचेचा सापळा आजमाविण्यात येईल. त्यानंतर श्रीमती सोनावणे मॅडम यांनी पडताळणी व सापाळा कारवाई बाबतची सविस्तर माहिती देवून योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर श्रीमती सोनावणे मॅडम यांनी मला याबाबत गोपनीयता राखण्याच्या सुचना देवून मला दिनांक 01/06/2021 रोजी सकाळी 09-30 वाजता अँन्टी करप्शन ब्युरोच्या रायगड अलिबाग कार्यालयात हजर राहण्याच्या सूचना दिल्या.

श्रीमती सोनावणे मॅडम यांनी दिलेल्या सूचनेप्रमाणे मी दिनांक 01/06/2021 रोजी सकाळी 09-30 वा चे सुमारास अँन्टी करप्शन ब्युरो रायगड अलिबाग येथील कार्यालयात जावनू श्रीमती सोनावणे मॅडम यांना भेटलो त्यांनी माझी पडताळणी पथकातील अंमलदार व पंच साक्षीदार 1) दिग्विजय आनंदराव कोळी, सहा.मोटार वाहन निरीक्षक, आरटीओ कार्यालय पेण व 2) विशाल भगवान जाधव, सहा.मोटार वाहन निरीक्षक, आरटीओ कार्यालय पेण यांचेशी ओळख करून दिली. त्यानंतर श्रीमती सोनावणे मॅडम यांनी पडताळणीचे कार्यवाहीबाबत आम्हास माहिती देवून योग्य त्या सूचना दिल्या आणि माझी व पंचांची वक्तव्य डिजिटल व्हाईस रेकॉर्डरध्ये ध्वनीमुद्रीत करून घेतली.

त्यानंतर 10-17 वाजता मी माझे फोनवरून लोकसेवक श्री.मोरे कनिष्ठ अभियंता यांना फोन केला व सदरचा माझा फोन स्पिकर ऑन केला. तेव्हा पोह/पाटील यांनी सदरचे संभाषण डिजिटल व्हाइस रेकॉर्डमध्ये ध्वनीमुद्रीत करून घेतले. सदर संभाषणात श्री.मोरे यांनी मला सबडिव्हिन ऑफीस येथे गाडी घेवून बोलाविले, तेथून नागाव येथे साईटवर जाणार असल्याचे मोरे यांनी सांगितले

त्यानंतर मी दिलेल्या तक्रारीची पडताळणी करण्यासाठी सुमारे 10-23 वाजता माझे कडे व्हाइस रेकॉर्डर सुरू करून देवून मला पंच श्री. दिग्विजय कोळी यांचेसह माझी इर्टीगा वाहन क्रमांक एम.एच.06/सीडी/9961 ने अलिबाग सबडिव्हिजन येथे गेलो. तेथे कार्यालया बाहेरील रोडलगत मी माझी कार थांबिविली. तेव्हा लोकसेवक मोरे कार्यालयाबाहेर हजर होते . ते माझे कारमध्ये येवून बसले, त्यानंतर पंच कोळी, मी, आणि लोकसेवक मोरे असे आम्ही सर्व जण माझे कारने मी कार चालवत नागाव बीच रोडवरील हिना शेठ यांचे कॉटेजचे साईटवर गेलो. तेथे रस्त्याचे कडेला कार थांबविल्यावर मी व लोकसेवक मोरे आणि आमचे मागोमाग पंच कोळी असे साईटवर आले. तेथे साइटवर जागा मालक जितेंद्र शेठ हजर होते. लोकसेवक मोरे यांनी साइटवर पाहणी केली. त्यानंतर साईटवरून निघून मी, पंच कोळी, मोरे असे लोकसेवक मोरे यांचे एमएसइडीसीएल च्या नागाव सेक्शन ऑफीसला आलो. ऑफीसमध्ये कोणी नव्हते लोकसेवक मोरे यांनी स्वत: ऑफीस उघडून आम्ही आतमध्ये गेलो. त्यानंतर लोकसेवक मोरे यांनी त्यांच्या कार्यालयातील लॅपटॉपवर माझे वरील साइटवर ट्रान्सफॉर्मर बसविण्याचे कामाचे इस्टीमेट तयार करून दिले व ते एसडीओ एमएमडीसीईएल ऑफीसला सबमिट करणेस मला सांगितले. त्यानंतर मी लोकसेवक मोरे यांना बाकी काय करायचे? असे विचारले असता, लोकसेवक मोरे बोलले की, तुला काय करायचे ते कर, नाही केलेस तरी चालेल तेव्हा मी लोकसेवक मोरे यांना बोललो की, स्पष्ट सांगा तुम्ही तीस हजार बोलला होतात काहीतरी कमी करा. तेव्हा लोकसेवक श्री.मोरे हे मला बोलले की, सगळे देतात त्याप्रमाणे तु पंधरा हजार दे... असे बोलून लाचेची मागणी केली. त्यानंतर मी आणि लोकसेवक मोरे व पंच कोळी असे सर्व माझे कारने नागांव येथून अलिबाग येथे येण्यास निघालो. तेव्हा लोकसेवक मोरे यांनी मला सांगितले की, त्यांना आता कामानिमित्त पेण येथे जायचे आहे. मी लोकसेवक मोरे यांना गाडीमध्येच सांगितले की, आता अर्धे देतो आणि अर्धे ट्रान्सफॉर्मर बसवलेवर देतो. तेव्हा लोकसेवक मोरे ठिक आहे असे म्हणाले. त्यानंतर आम्ही अलिबाग सबडीव्हीजन ऑफीस समोर कारने आल्यावर गाडीतून उतरताना मी लोकसेवक मोरे यांना सांगितले की, पेण वरून आलेत की कॉल करा.. तेव्हा ते ठिक आहे म्हणून निघून गेले. त्यानंतर मी आणि पंच कोळी असे कारने सबडिव्हिजन आफीस येथून निघून अँन्टी करप्शन ब्युरोचे कार्यालयात परत आलो. सदरचे समक्ष भेटीतील संभाषण व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत करण्यात आले आहे.

त्यानंतर मी पोलीस उप अधीक्षक श्रीमती सोनावणे मॅडम यांना सांगितले की, लोकसेवक यांनी करून दिलेले इस्टीमेटची कॉपी सबडिव्हिजन ऑफीस येथे जमा करावी लागेल, तेव्हा पोलीस उप अधीक्षक श्रीमती सोनावणे मॅडम यांनी सदर रिपोर्टची अवलोकन करून सदरचा इस्टीमेट रिपोर्ट मला सबडिव्हिजन ऑफीस येथे जमा करणेस दिला. तसेच दुय्यम प्रतीचे छायांकीत प्रत काढणेस सांगितली त्याप्रमाणे मी अलिबाग एम. एस.इ.डी.सी.एल. कार्यालयाच्या सबडिव्हिजन ऑफीस मध्ये जावून सदर ईस्टमेट प्रत जमा केली. दुय्यम प्रतीची छायांकीत प्रत पोलीस उप अधीक्षक श्रीमती सोनावणे मॅडम यांच्याकडे सादर केली. त्यावर आम्ही पंचांनी व पोलीस उप अधीक्षक सोनावणे मॅडम यांनी सह्या केल्या त्यानंतर सदरची प्रत पोलीस उप अधीक्षक श्रीमती सोनावणे मॅडम यांनी ताब्यात घेतली.

श्री.मोरे, कनिठ अभियंता हे मला पेण येथील त्यांचे काम संपवून आल्यानंतर फोन करणार होते. तेव्हाच लाचेची रक्कम स्विकारणार असल्याने मी, पंच आणि पोलीस उप अधीक्षक श्रीमती सोनावणे मॅडम व पथकातील अंमलदार असे आम्ही अेसीबी अलिबाग कार्यालयात थांबून राहिलो.

त्यानंतर श्रीमती सोनावणे मॅडम यांनी सांगितले की, पडताळणी दरम्यान लोकसेवक श्री.मोरे यांनी तक्रारदार यांचेकडे 15,000/- रूपये लाचेची स्पष्ट मागणी केली असून स्पष्ट मागणी करून अर्धी रक्कम आता व उर्वरीत रक्कम ट्रान्सफॉर्मर बसविताना स्विकारण्याचे मान्य केले असल्याचे निष्पन्न झाले असल्याने श्री.मोरे यांचेविरूध्द लाचेचा सापळा आयोजीत करण्याचे ठरवून त्या अनुषंगाने सापळापुर्व पंचनाम्याची कार्यवाही करून योग्य त्या सूचना दिल्या. त्यावेळी मी माझे कडील 7500/- रूपये रक्कम सापळा कारवाइकरीता वापरण्याकरीता श्रीमती सोनावणे मॅडम यांचेकडे हजर केली.

त्यानंतर माझे कडे अँथ्रासीन पावडर लावलेले लाचेची रक्कम 7,500/- रूपये माझे पॅन्टच्या समोरील उजवे खिशात ठेवले. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्रीमती सोनावणे मॅडम यांनी मला, पंचानां, पथकातील अंमलदार यांना योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर संध्याकाळचे पाच वाजले

तरी लोकसेवक मोरे यांचा फोन न आल्याने सोनावणे मॅडमच्या सुचनेवरून मी 17-24 वाजण्याचे सुमारास माझे फोनवरून लोकसेवक मोरे यांना फोन केला तेव्हा त्यांनी सांगितले की, ते पेण वरून आलेले आहेत. थोडयाच वेळात अलिबाग सबडिव्हिजन कार्यालयात येणार आहेत. कार्यालयात आल्यानंतर ते मला फोन करणार असल्याचे त्यांनी मला सांगितले. सदर आमचे फोनवरील संभाषण ध्वनी मुद्रीत करण्यात आले आहे. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक सोनावणे मॅडम यांनी माझे व दोन्ही पंचांचे वक्तव्य ध्वनी मुद्रीत करून घेतले आहेत.

त्यानंतर 18-08 वाजण्याचे सुमारास मला माझे मोबाईलवर लोकसेवक मोरे यांचा फोन आला व मी सदर बाबत सोनावणे मॅडम यांना सांगितले तेव्हा सोनावणे मॅडमच्या सुचनेवरून मी फोन रिसिव्ह केला आणि लाउड्स स्पिकर ऑन केला. तसेच त्याच वेळी पोह/महेश पाटील यांनी डिजिटील व्हाइस रेकॉर्डर ऑन करून सदरचा कॉलवरील संभाषण ध्वनीमुद्रीत केले. त्या फोन कॉल नुसार लोकसेवक मोरे हे एम.एस.इ.डी. सी.एल.अलिबाग सबडीव्हिजन कार्यालयात आले असून त्यांनी मला बोलाविले होते.

त्यानंतर सापळा कारवाई करीता मी व माझे सोबत पंच नंबर 1 श्री.कोळी असे माझे कारने एमएसईडीसीएल कार्यालयाचे अलिबाग सबडिव्हिजन कार्यालयाजवळ आलो. माझेकडे डिजिटल व्हाइस रेकॉर्डर ऑन करून दिले होते. आमचे गाडीचे मागोमाग पोलीस उप अधीक्षक श्रीमती सोनावणे मॅडम, पोह/मोरे, पोह/शिर्के, पोह/महेश पाटील सरकारी वाहनावरील चालक सफौ/घरत असे एमएसईडीसीएल कार्यालयाचे अलिबाग सबडिव्हिजन कार्यालयाजवळ आले. मी गाडी कार्यालया बाहेरील रोडवर थांबवविली थोडयाच अंतरावर सफौ. घरत यांनी त्यांचे वाहन थांबवून ठेवले. मी गाडीच्या बाहेर उतरालो. लोकसेवक मोरे साहेब हे कार्यालयाचे रोडलगतचे गेटजवळ उभे होते. त्यांचे जवळ इतर 2-3 इसम उभे होते ते त्यांचेशी चर्चा करीत होते. इतर इसम असल्याने श्री.मोरे साहेब यांनी हाताच्या इशाराने मला थांबणेस सांगितले. त्याचे जवळील इसम निघून गेल्यावर मी मोरे साहेब यांचे जवळ गेलो. तेव्हा मोरे साहेब यांनी हाताचे इशाराने लाचेच्या रक्कमेबाबत विचारणा केली असता मी माझे पॅन्टच्या समोरील उजव्या खिशातील लाचेची रक्कम उजवे हाताने काढून त्यांच्या समोर धरली असता लोकसेवक मोरे साहेब यांनी ती त्यांच्या डाव्या हाताने स्विकारून त्यांच्या पॅन्टच्या डाव्या हिपपॉकेट मध्ये ठेवली. त्याच वेळी लोकसेवक श्री मोरे यांनी लाचेची रक्कम स्विकारली असल्याबाबत पुर्व नियोजित इशारा केला व त्यावेळी सुमारे 18:26 वाजता अँन्टी करप्शन पथकाने श्री.मोरे, यांना कार्यालयाचे गेटजवळ रंगेहाथ पकडले व लाचेची रक्कम त्यांच्याकडून जप्त केली.

अशा रितीने श्री.अतुल मनोहर मोरे वय 32 वर्षे, कनिष्ठ अभियंता, एम.एस.इ.डी.सी.एल. नागाव सेक्शन, वर्ग-3 यांनी मी कॉन्ट्रॅक्ट घेतलेल्या श्रीमती हिना शेठ यांचे नागाव येथील हॉटेलला ट्रान्सफॉर्मर बसविण्यासाठी अर्ज केला असताना सदरचे ट्रान्सफॉर्मर बसविण्याचे ईस्टीमेट देण्यासाठी आज दिनांक 01/06/2021 रोजी पंच साक्षीदार यांच्या समक्ष 15000/- रूपये लाचेची मागणी करून, सदर लाचेच्या रक्कमेचा पहिला हप्ता अर्धी रक्कम आता व अर्धी रक्कम ट्रान्सफॉर्मर बसविल्या नंतर स्विकारण्याचे मान्य केले. त्याप्रमाणे दिनांक 01/06/2021 रोजी 18-26 वाजता लाचेच्या रक्कमेचा पहिला हप्ता रक्कम 7,500/- रूपये हे एम.एस.ई.डी.सी.एल. चे सबडिव्हिजन कार्यालय चेंढरे अलिबाग येथे कार्यालयाचे गेटजवळ पंच साक्षीदारांसमक्ष स्विकारताना अँन्टी करप्शन ब्युरो, रायगड पथकाने रंगेहाथ पकडून लाचेची रक्कम त्यांचेकडून हस्तगत करण्यात आली.

म्हणुन माझी श्री.अतुल मनोहर मोरे वय 32 वर्षे, कनिष्ठ अभियंता, एम.एस.इ.डी.सी.एल. नागाव सेक्शन, वर्ग-3, रा. मुक बधीर शाळेच्या पाठीमागे, बालाजी टॉवर समोर, पाण्याचे टाकीजवळ, चेंढरे, अलिबाग जि.रायगड मुळ रा. प्लॉट नंबर 251, फ्लॅट नंबर 104, श्रीराम कॉम्प्लेक्स, कानसई सेक्शन, अंबरनाथ पुर्व यांचे विरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 चे कलम 7 प्रमाणे फिर्याद आहे.

सदरची खबर रजिस्टरी नोंद करून वरिष्ठांचे आदेशान्वये सदर गुन्हयाचा तपास पोलीस उप अधिक्षक श्रीमती सुषमा सोनावणे अँटी करप्शन ब्युरो रायगड अलिबाग हे करीत आहेत.

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** Kerubhau Dattatray Kolhe(I (Inspector)) / POBN67105 **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):**

**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

**(4) Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म)

14. Signature/Thumb impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

ठाणे अंमलदार
अलिबाग पोलीस ठाणे

Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची

Name (नाव): Kerubhau Dattatray Kolhe
Rank(पद): I (Inspector)
No.(सं.): POBN67105